# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.)ता. जि. ठाणे. :- ४०१ १०१
**सार्व. आरोग्य विभाग**


**जा. क्र. मनपा/आरोग्य/३५५/२०२२-२३** **दि.१४/११/२०२२**

## मिरा - भाईंदर महानगरपालिका शहर समन्वयक पदाकरीता ठोक मानधनावरील थेट मुलाखत (Walk In Selection)

### जाहीर सूचना

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्व.आरोग्य विभागाकरीता शहर समन्वयक (City Co-ordinator) पदाकरीता तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावरील ०२ जागा थेट मुलाखतीद्वारे (Walk In Selection) भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांना अर्जासह मुलाखतीसाठी उपस्थित राहाण्याची विनंती करत आहेत. खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या तसेच इतर अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी, विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांची झेरॉक्स प्रत टपालव्दारे अथवा स्वतः मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, सार्व. आरोग्य विभाग, पहिला मजला येथे दि.२१/११/२०२२ पर्यंत मुदतीत पाठविण्यात यावेत. सदर पदाकरीता आवश्यक प्रमाणपत्रांच्या मूळ प्रतींसह दि.२५/११/२०२२ या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या वेळेत मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, भाईंदर (प) ठाणे ४०११०१ येथे स्वखर्चाने मुलाखतीकरीता उपस्थित रहावे. याबाबतची सविस्तर माहिती मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

- **उपलब्ध पद संख्या – 02 (ठोक मानधन (मासिक) रु. ४५,०००/- (सर्व भत्त्यांसह))**

सदर पदाकरीता अर्ज प्रक्रिया तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | जाहिरात प्रसिद्ध व अर्ज स्विकृती | दि.१४/११/२०२२ ते दि.२१/११/२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यत |
| २ | अर्ज छाननी | दि.२२/११/२०२२ |
| ३ | पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द | दि.२३/११/२०२२ |
| ४ | मुलाखत | दि.२५/११/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता. |
| ५ | निवड यादी प्रसिध्द करणे | दि.२५/११/२०२२ रोजी सायं. ०५.०० वाजता. |

**१) शैक्षणिक अर्हता :-**

| अ.क्र. | पदाचे नांव | शैक्षणिक पात्रता | अनुभव |
|---|---|---|---|
| १. | शहर समन्वयक (City Co-ordinator) | १. मान्यता प्राप्त विद्यापीठातील खालीलपैकी कोणत्याही शाखेतील पदवी.<br>अ. बी. ई. / बी. टेक (कोणतीही शाखा)<br>ब. बी.आर्क<br>क. बी. प्लॅनिंग | स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडीत कामाचा किमान सहा महिन्याचा अनुभव आवश्यक आहे. |

**२) वयोमर्यादा :-**

उमेदवारांकरीता किमान वयोमर्यादा १८ वर्षे पुर्ण व कमाल ३५ वर्षे आहे. (शहर समन्वय म्हणुन अनुभव करणाऱ्या उमेदवारास अनुभव वयोमर्यादा शिथील करता येईल)

